# पदार्थ विज्ञान - अनुमान निरुपण

Vd. Gayatri Sawant

MD (Ayu-Siddhanta and Darshan)
MS ( Counseling & Psychotherapy)
MA (Sanskrit), Dip. In Manuscriptolgoy

Associate Professor
Dept. of Samhita - Siddhanta,
MAM's SSAM, Hadapsar, Pune - 28

# अनुमान शब्दाचा अर्थ

- अनु + मान = अनुमान
- अनचा अर्थ पश्चात व मार्न चा अर्थ मोजमाप अर्थात ज्ञानकरण.
- दोषरहित ज्ञान ज्याच्याद्‌वारा केले जाते त्यास अनुमान म्हणतात.

# अनुमान निरुक्ति

- “अनुपूर्वम् हेतुं दृष्टा पश्चात् मीयते इति अनुमानम्।”
  प्रथम हेतुला (कारणाला) बघून पश्चात (नंतर) त्याच्या आधाराने अप्रत्यक्ष (परोक्ष) विषयाचे ज्ञान प्राप्त होण्यास कारणीभूत असणाऱ्या प्रमाणाला अनुमान प्रमाण म्हणतात.

- “अनुमितिकरणम् अनुमानम् ।” ...तर्कसंग्रह
  अनुमितीच्या असाधारण कारणाला अनुमान म्हणतात. अनुमिति हे अप्रत्यक्ष ज्ञान आहे.

# अनुमान परिभाषा (व्याख्या)

- “येन अनुमीयते तद् अनुमानम् |” ...तर्कभाषा
- “अनुमानं खलु तर्को युक्ति अपेक्षः। यथा-अग्नि जरणशक्त्या,बलं व्यायाम शक्त्या ॥” ...च.वि. ४/४
- “वस्तु यत् परोक्षं पद् अनुप्रत्यक्षात् पश्चाद् यद् मीयते ज्ञायते तद् अनुमानम् |” ...गंगाधर रॉय

# अनुमान प्रमाण लक्षण

- “अनु पश्चाद् व्यभिचारि लिंगालिंगी मीयते ज्ञायते येन तदनुमान |”...च.सू. १९/२१ व डल्हण

- “लिंग परामर्शेनाऽनुमीयतेऽतो लिंग परामर्शोऽनुमानम् ।” ...तर्कभाषा

- “मितेन लिंगेनार्थस्य पश्चात् मानम् अनुमानम्।”...वात्स्यायन

# अनुमान प्रकार

१. **अन्वयी अनुमान:-** हेतूचा साध्याशी होकारात्मक संबंध

२. **व्यतिरेकी अनुमान:-** जेथे साध्याचा अभाव असतो तेथे हेतुचा ही अभाव असतो.

३. **अन्वयव्यतिरेकी अनुमान:-** जेथे हेतु असतो तेथे साध्य असते व जेथे साध्य नसते तेथे हेतु ही नसतो.

# चरकोक्त अनुमान प्रकार

- “प्रत्यक्षपूर्वं त्रिविधं त्रिकालं च अनुमीयते ।
  बन्हिर्निगुढो धूमेन मैथुनं गर्भदर्शनात् ॥
  एवं व्यवस्यन्त्यतीतं बीजात् फलम् अनागतम् ।
  दृष्ट्वा बीजात् फलं जातं इह एव सदृशं बुधाः ॥”
  ...च.सू. ११/ २१ -२२

१.वर्तमानकालिन अनुमान
२.भूतकालिन अनुमान
३.भविष्यकालिन अनुमान

# न्याय दर्शनोक्त अनुमान प्रकार

- “अथ तत्पूर्वकं त्रिविधम् अनुमानं पूर्ववत् शेषवत् सामान्यतो दृष्टं च |” ... न्यायदर्शन १/५

१. **पूर्ववत:-** कारणावरून पुढे उत्पन्न होणाऱ्या कार्याचे अनुमान होते त्यान पूर्ववत् अनुमान म्हणतात.
२. **शेषवत्:-** कार्यावरुन कारणाचे अनुमान करणे त्याला शेषवत् अनुमान म्हणतात.
३. **सामान्यतोदृष्ट:-** सामान्यतोदृष्ट अनुमान याचे लक्षण वरील दोघांपेक्षा भिन्न आहे. कोणत्याह वस्तुला पाहून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या तत्समान वस्तुचेच अनुमान सामान्य अनुमान किंवा सामान्यतोदृष्ट अनुमान होय.

# तर्कसंग्रहोक्त अनुमान प्रकार

- “अनुमान द्विविधं स्वार्थ परार्थ च |”

**१. परार्थानुमान:-**

१.व्याप्तिग्रह २.विशिष्ट स्थळी साध्य संदेह

३.हेतुदर्शन ४.व्याप्तिस्मरण

५.लिंग परामर्श ६.अनुमिती या क्रमाने स्वार्थानुमान होते.

**२. स्वार्थानुमान:-** “प्रतिज्ञा हेतु उदाहरण उपनयनिगमनानि पंचावयवः |” ... तर्कसंग्रह

(१)प्रतिज्ञा (२) हेतु

(३) उदाहरण (४) उपनय

(५) निगमन

# परार्थानुमान – पंचावयव… तर्कसंग्रह

(१) **प्रतिज्ञा:** “साध्यनिर्देशः प्रतिज्ञा |” …न्यायदर्शन

(२) **हेतु:** “उदाहरण साधर्म्यात् साध्यसाधनं हेतुः।” …न्यायदर्शन

(३) **उदाहरण:** “लौकिकपरीक्षकाणां यास्मिन्नर्थे बुद्धिसाम्यं स दृष्टान्तः।” …न्यायदर्शन

(४) **उपनय:** “उदाहरणापेक्षस्त थेत्युपनयः|” …न्यायदर्शन

(५) **निगमन:** “हेत्वपदेशात् प्रतिज्ञायाः पुनर्वचनं निगमनम्।”…न्यायदर्शन

# चरकोक्त परार्थानुमान

१. **प्रतिज्ञा:-** "'अथप्रतिज्ञा-प्रतिज्ञानाम् साध्य वचनम् यथा- नित्यः पुरुष इति|" ...च.वि. ८/३०

२. **हेत:-** "अथ हेतु: हेतुर्नामोपलब्धिकारणम्, तत् प्रत्यक्षम,अनुमानम, ऐतिह्यम् औपम्यमिति, एभिर्हेतुभिर्य दुपलभ्यते तत् तत्वम् ।" ...च. वि.८/३३

३. **दृष्टात:-** "अथ दृष्टान्तः दृष्टान्तो नाम यत्र मुर्खविदुषां बुद्धिसाम्यं यो वर्ण्य वर्णयति । यथा- अग्निरुषणम , द्रवमुदकं, स्थिरापृथिवी, आदित्यः प्रकाशक इति, यथा आदित्यः प्रकाशकस्तथा सांख्यवचनं प्रकाशकमिति ।"...च.वि. ८/३४

४. **उपनय:-** "उपनयो चोक्तं स्थापना व्याख्यायाम् ॥"...च.वि. ८/३५

५. **निगमन:-** "निगमनं तस्माद् नित्यः इति।"...च.वि. ८/३५

# वात्सायनाने

- परार्थानुमान सिद्धिसाठी खालील पाच अवयवांचा उल्लेख केलेला आहे.
  - **१.जिज्ञासा**
  - **२.संशय**
  - **३.शक्यप्राप्ति**
  - **४.प्रयोजन**
  - **५.संशयव्युदास**

# लिंगपरामर्श व प्रकार –

- “स्वार्थानुमिति परार्थानुमित्योर्लिंग परामर्श एव करणम् । तस्माद् लिंगपरामर्शो अनुमानम्।”... तर्कसंग्रह
- लिंग (हेतु) तीन प्रकारचे असते.

  **(1) केवलान्वयि**

  **(2) केवलव्यतिरेकि**

  **(3) अन्वय व्यतिरेकि**

# हेतु के प्रकार

1. **सद्हेतु**
2. **असद्हेतु**

**सद्हेतु:-** (१)पक्षसत्वम्
(२)सपक्षेसत्वम्
(३)विपक्षेअसत्वम्
(४)अबाधितविषयत्वम्
(५)असत्प्रतिपक्षत्वम्

**असद्हेतु:-** १.सव्यभिचार २.विरुद्ध ३.सत्प्रतिपक्ष ४.असिद्ध ५.बाधित

# हेत्वाभास (तर्कसंग्रह)

**१. सव्यभिचार हेत्वाभास:-** १. साधारण
२.असाधारण
३.अनुपसंहारि

**२. विरुध्द हेत्वाभास**

**३. सत्प्रतिपक्ष हेत्वाभास**

**४. असिध्द हेत्वाभास:-** १.आश्रय असिद्‌ध
२.स्वरुप असिद्‌ध
३.व्याप्यत्व असिद्‌ध

**५. बाधित हेत्वाभास**

# हेत्वाभास (चरक)

१. प्रकरणसम हेत्वाभास

२. संशयसम हेत्वाभास

३. वर्ण्यसम हेत्वाभास

# Thank you